# प्रस्तावना

बार्शी शहराचा आर्थिक इतिहास लिहिण्याची प्रेरणा माझे गुरुवर्य व मार्गदर्शक डॉ. व्ही.एस. कदम यांनी दिली. प्रबंध पूर्ण करण्यासाठी त्यांनी मला प्राथमिक ज्ञानापासून मार्गदर्शन केले. यासाठी त्यांनी आपला अमूल्य वेळ दिला. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी.आर. कांबळे, यांनी माझ्या अडचणी समजून घेऊन सहकार्य केले. या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

बार्शी नगरपालिकेचे संपूर्ण रेकॉर्ड पहाण्यास तेथील नगराध्यक्षा श्रीमती प्रभाताई झाडबुके यानी परवानगी दिली तसेच नगरपालिकेच्या रेकॉर्डरूमचे काम पहात असलेले राजेंद्र वायचळ यांनी सहकार्य केले याबद्दल मी दोघांचे आभार मानते.

बार्शी शहरामधील सूत गिरण्यांची माहिती गोळा करत असताना लोकमान्य मिलमध्ये काम करत असलेले सहस्त्रबुध्दे यांनी सहकार्य केले. तसेच सामाजिक व राजकीय माहिती मिळविण्यासाठी बार्शीतील कार्यकर्ते अ.दा. सहस्त्रबुध्दे, श्रेणिक दिगंबर देवधरे, सौ. सुमतीबाई टिळक, डॉ. विणा सुराणा, यांनी मला त्यांचा अमूल्य वेळ देऊन अत्यंत मोलाचे सहकार्य केले याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानते.

जयप्रकाश शिक्षण संस्थेचे संस्थापक, चेअरमन माननीय नानासाहेब माने यांनी मला एम.फिल. करण्यासाठी परवानगी दिली व त्यांच्या प्रेरणेने प्रबंध पूर्ण केला याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते.

Bangar
(श्रीमती बांगर प.एस.)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 27-11-87